नियमित फौ. ख. क्र. १३२/२०२४
सरकार -वि.- क्रिष्णा
नि.क्र. १८

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र.५ यांची जबानी</u>**

**<u>मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,</u>**

माझे नाव - आनंद रामभाऊ धात्रक,
वय ४७ वर्षे, व्यवसाय – पो.ह. ब.क्र. ७८५
राहणार – पोलीस स्टेशन भिवापूर ता. भिवापूर, जि. नागपूर.

**<u>सरतपासणी-सहायक सरकारी अभियोक्ता श्री एस.एस.मोरे यांचे मार्फत</u>**

१. मी आरोपींला ओळखतो. तो आज कोर्टात हजर आहे. मी फिर्यादीला ओळखतो. दिनांक ०३.०९.२०२४ रोजी मी पोलीस स्टेशन, भिवापूर येथे पोलीस हवालदार म्हणून कार्यरत होतो. त्यादिवशी माझी डे ऑफीसर म्हणून ड्यूटी होती. त्यादिवशी गुन्हा क्रमांक ३९३/२०२४ नोंद झाला होता. त्याचा प्राथमिक तपास माहुरे यांनी केला व पुढील तपास माझ्याकडे आला. तपासा दरम्यान मी गुन्हयात वापरलेला दगड फियार्दीने दाखविल्याप्रमाणे घटनास्थळी पंचासमक्ष जप्त केला. तसा जप्ती पंचनामा तयार केला. आता मला दाखविलेला जप्ती पंचनामा तोच आहे. त्यावर माझी व पंचांच्या सह्या आहेत. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **निशाणी १९** देण्यात येते. त्यानंतर जखमीच्या वैद्यकीय प्रमाणपत्राबाबत वैद्यकीय अधिका-याकडे क्युरीकरीता पत्र दिले होते. आता मला दाखविलेले पत्र तेच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **निशाणी २०** देण्यात येते. त्यानंतर जप्त केलेला मुददेमालची मुददेमाल पावती फाडली. आता मला दाखविलेले पावती तीच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **निशाणी २१** देण्यात येते. साक्षीदारांचे बयान नोंदविले. तपासाअंती दोषारोप पत्र दाखल केले. जप्त केलेली दगड मला दाखविली तर मी ते ओळखू शकतो. आता मला दाखविलेले **आर्टिकल 'अ'** वरील दगड तोच आहे.

सरततपास संपला.

**<u>उलट तपास आरोपी तर्फे त्यांचे वकील श्री नागोशे यांचे मार्फत</u>**

२. हे म्हणणे खरे नाही की, जप्त दगड कोणाकडुन जप्त केला होता ते निशाणी १९ च्या पंचनाम्यावर नमुद नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचान समक्ष

जप्तीची कार्यवाही केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचाना नोटीस दिला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी वैदयकीय अधिकाऱ्यांकडुन जप्त केलेले दगडाची क्युरी करून घेतली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी साक्षीदारांचे बयाण त्यांच्या म्हण्यानुसार घेतले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला तपास असे निषपण झालेअ होते की आरोपीची पत्नी व फियार्दी यांचे तंटामुक्त अध्यक्षासमोर लग्न ठरले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी आरोपीची मुल फिर्यादी ठेवायला तयार नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी आरोपीच्या त्याचा पत्नीला म्हण्ने होते की तु मुलांना घेवुन फिर्यादीकडे जा. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने फिर्यादीची तंटामुक्तीकडे तक्रार केल्यामुळे त्याची बदनामी झाली असे फिर्यादीला वाटत होते त्यामुळे तो चिडला होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे फिर्यादीने खोटी फिर्याद दिली. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचाना नोटीस दिला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी फिर्यादी सोबत संगनमत करुन खोटा तपास करुन खोटे दोषारोप पत्र दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी प्रमाणे कुठलीही घटना घडली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, मला तपास असे निष्पण झाले होते की आरोपीची व फियार्दीमध्ये घटनेपुर्वी पासुन बोलचाल बंद आहे. हे म्हणने खरे नाही की, मला तपासात असे निष्पन झाले होते की फिर्यादी व त्याचा मित्र मोटारसायकलने जात असतांना पडले होते. आर्टिकल अ वरील दगड फिर्यादीने दिला होता. हे म्हणने खरे नाही की, **आर्टिकल अ** वरील दगडांने फिर्यादीला मारहाण झाली. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास संपला.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,

दिनांक ०९.१०.२०२५.

स्वा/-
( एस.जे. लाड )
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.